ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651 (UIF) VOLUME - 7 | ISSUE - 3 | APRIL - 2017

ISRJ

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# महात्मा बसवेश्वरांचे वचन साहित्य : एक आकलन

प्रा.डॉ. संजय कुलकर्णी
मराठी विभाग प्रमुख, जवाहर महाविद्यालय, अणदूर, ता. तुळजापूर.

प्रस्तावना :



१२व्या शतकात भारतातील संपूर्ण समाजाला परिवर्तन करण्याचा प्रयत्न करणारे महापुरुष म्हणजे महात्मा बसवेश्वर. महात्मा बसवेश्वरांचे वचन साहित्य हे मूळ कन्नड भाषेत असल्यामुळे त्याचा आस्वाद मराठी भाषिकांना घेणे दूरापास्त होते. वचनामध्ये जो सामाजिक आशय व तत्वज्ञान आहे तो नवसमाज निर्मितीसाठी संजिवक आहे. मूल्य हरवत चाललेल्या समाजाला आणि युवा पिढीला वचन साहित्याने नवसंजिवन मिळेल. मराठीमध्ये वारकरी, महानुभाव या संप्रदायाच्या साहित्याची उपलब्धी विपुल प्रमाणात आहे. पण वीरशैव साहित्य आणि महात्मा बसवेश्वराचे वचन वाङ्मय यांची कमतरता प्रकर्षाने जाणविते. बसवेश्वरांच्या विचारांचा सार वचनामध्ये असून वचन लोक जागृतीचे एक प्रभावी माध्यम आहे. मध्ययुगीन काळात महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वैचारीक मांडणीतून प्रबोधनाचे कार्य केले ते लोकजागृतीसाठी उपयुक्त ठरले. आजही त्या विचारांची तितकीच आवश्यकता आहे. वचना साहित्याचा केद्रबिंदू हा माणूस आहे. माणसाचे अध्यात्मिक मूल्य वाढविणारे महात्मा बसवेश्वराचे वचन साहित्य आहे. अनुभव मंटपात लोकसत्ताक पद्धतीने चर्चा करुन या साहित्याची निर्मिती करण्यात आली. लोकभाषेतून ती मांडली गेली.

साहित्य ही समाजाची अस्मिता असते. समाजजीवन साहित्यात प्रतिबिंबित झालेले असते. ती समाजाच्या सजीवतेची प्रेरणा असते. साहित्य हे संस्कृतीचे एक अत्यावश्यक अंग असते. वि. वा. शिरवाडकर म्हणतात, 'श्रेष्ठ साहित्य हे संस्कृतीचं आधारतत्व असतं कारण ते तिच्या मूलभूत मूल्यांशी बांधलेलं असतं.' भारतात हिंदू, इस्लाम, ख्रिस्त, वीरशैव, शीख, बौद्ध, जैन, पारशी, बहाई अशा विविध धर्मियांचे वास्तव्य आढळते. या प्रत्येक धर्मियांचे स्वतःचे व वैशिष्ट्ये पूर्ण असे साहित्य उपलब्ध आहे. हिंदू, मुस्लिम, ख्रिस्त, वीरशैव, बौद्ध, जैन, शीख, पारशी, ग्रामीण, आदिवासी साहित्य इ. हे भारतीय साहित्यांचे प्रमुख अंग होत, काही प्रमुख प्रकार होत.

वीरशैव साहित्य म्हणजेच लिंगायत धर्माचे साहित्य होय. वीरशैव साहित्य देखील विविध, विपुल व समृद्ध आहे. आगमग्रंथ, वचनग्रंथ हे वीरशैव साहित्याचे दोन आधारस्तंभ आहेत. संस्कृत आणि कन्नड या दोन्ही वीरशैवांच्या धर्मभाषा होत. आगमग्रंथ हे संस्कृमध्ये असून ते वीरशैव धर्माचे प्राचीन तर वचनग्रंथ हे कन्नडमध्ये असून ते वीरशैव धर्माचे आधुनिक साहित्य होय.

- आगमग्रंथ -

हा वेदाप्रमाणेच आणखी एक प्राचीन भारतीय साहित्याचा स्त्रोत आहे. या ग्रंथात आगमंत, दिव्यागम, शिवागम, वीरशैवागम इ. विविध नावांनी संबोधले आहे. हा एकच ग्रंथ नसून वेदाप्रमाणे धर्मग्रंथ संहिता आहे. आगम ही अठ्ठावीस प्रमुख ग्रंथाची संहिता आहे. यात कामिकागम, स्वायागम, भुवागम, नित्यागम, वीरागम, विमलागम, ललितागम, सिद्धागम अशी २८ आगमांची नावे आहेत. हा ग्रंथ वीरशैवांचा 'शवशक्तिप्रणित' धर्मग्रंथ संहिता आहे. आगमनात वर्णिलेले ज्ञान म्हणजेच मूलशास्त्र होय की, जे भगवान शिवाने आपली पत्नी पार्वतीला समजावून सांगितले आहे. या संदर्भातच डॉ. श्रीधर केतकरांनी या आगमांचा उल्लेख करताना, 'शिवपार्वती संवाद उर्फ अनेक विद्यांचा संगम'असे म्हटले आहे.

- वचनग्रंथ -

वचनकारांच्या म्हणजे शिवशरणांच्या रचनांना उद्देशून 'वचनशास्त्र' असा शब्दप्रयोग केला जातो. यामध्ये देवर दासिमय्या, अल्लमप्रभू, बसवेश्वर, चन्नबसवेश्वर, सिद्धरामेश्वर, अक्कमहादेवी इ. अनेक महाशिवशरणांच्या वचनांचा समावेश होतो. सामान्यतः इ.स.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

१२वे शतक हा वचन साहित्याच्या निर्मितीचा मुख्य कालखंड मानला जातो. वचनांचा कालावधी, संख्या, वैशिष्ट्ये विशद करताना अभ्यासक डॉ. एस. सी. नंदीमठ लिहितात, '११व्या ते १८व्या शतकातील २१३ वचनकारांची वचने विकसित झाली आहेत. वचन साहित्याचे खास वैशिष्ट्ये म्हणजे वचनकार हे समाजाच्या सर्व स्तरातील होते. त्याची वचने धार्मिक व सामाजिक सुधारणांचे जोरदार समर्थन करणारी तसेच श्रमाचा सदोदित गौरव जोपासणारी आहेत. यामुळेच आजच्या कालखंडामध्येही वचन साहित्यांचे महत्व आपणास लक्षात घ्यावे लागते. वचनकारांनी आध्यात्मिक विचारांचे, नितिमत्ता, व्यक्तिमत्व, सामाजिकता, राजकारण इ. असलेल्या संबंधाचे स्पष्टीकरण देऊन त्याचे सामाजिकरण केले आहे. पाश्चात विचारवंत व अभ्यासक डॉ. के. व्हि. झ्वेलेबिल वचन साहित्याबद्दल लिहितात, 'बसवेश्वरांच्या वचनामध्ये आढळणाऱ्या अंत्यत उच्च साहित्यिक आणि तत्वज्ञानाविषयक मूल्यामुळे वचन साहित्यांचा समावेश जागतिक अभिजात साहित्यात करण्यात यावा. बसवेश्वरांनी वचनामध्ये दिलेला संदेश अवघ्या भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण विश्वासाठी आजच्या काळातही उपयुक्त आहे. वीरशैव धर्म विचारापेक्षा आचाराला महत्त्व व प्राधान्य देतो. वीरशैव धर्माची ही आचारप्राधान्यता वचनकारांनी साधलेली आढळून येते. महात्मा बसवेश्वर हे तर विचार व आचार यांच्या समन्वयाचे उत्कृष्ट प्रतीक आहेत. वचनातील विचार सामान्यापासून ते योग्यापर्यंत सर्वांनाच, अनुकरणीय ठरले आहेत. बसवेश्वरांची वचने ही सर्व जीवनस्पर्शी, जीवनव्यापी, जीवनप्रभावी आहेत. सर्व मानव जातीला अधिकारवाणीने मार्गदर्शन करण्याची परिपूर्ण क्षमता बसवेश्वरांच्या वचन साहित्यात सामावलेली आहे. मूळ कन्नड भाषेतील वचने आता इंग्रजी, हिंदी, मराठी, उर्दू, गुजराती भाषांमध्ये अनुवादीत झाली आहेत. कथा, कविता, कादंबरी, नाटक इत्यादी वाङ्मय प्रकारातून बसवेश्वरांचे साहित्य उपलब्ध होत आहे. कर्नाटकामधील सर्व विद्यापीठात तसेच प्राथमिक व माध्यमिक स्तरांवर बसवेश्वरांच्या साहित्यांचा आवर्जुन समावेश केला जात आहे ही अत्यंत समाधानाची व आनंदाची बाब आहे. महाराष्ट्रात व इतर राज्यातही वचनसाहित्याचा प्रसार होण्यास अनुकूलता निर्माण झाली आहे. महाविद्यालय व माध्यमिक स्तरावर वचनसाहित्याचा विचार अभ्यासक्रमामध्ये समावेश होताना दिसत आहेत.

- बसेश्वरांचे अनुभव मंटप -

धर्म, भाषा, ज्ञान ही एका वर्गाची मक्तेदारी झाली होती. तिला धक्का देण्याचे काम महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपाच्या माध्यमातून केले. वचनातील विचारांनी अनेक शरण-शरणींना प्रभावित केले. अनेक शरणाच्या वचनांनी अनुभव मंटप उजळून निघाले. मानवजातीच्या कल्याणाच्या दिशेने धर्माची पावले वळली. सर्व शिवशरण आणि शिवशरणी जात, वर्ग, वर्ण, लिंग, भेदभाव न ठेवता एकत्र बसून चर्चा करीत असत. ती चर्चा किंवा अभिप्राय लिहून ठेवत असतं. वचन साहित्याची ही मोठी चळवळ होती. ती एक क्रांतीच होती. त्यातील अनुभव, तत्वज्ञान, साहित्यगुण, मानव कुळाचे कल्याण इत्यादी सर्व गोष्टी चिंतनशील आहेत.

- वचन साहित्यातील एकेश्वरवाद -

वीरशैव धर्म हा मूलतः एकदेवोपासक, शिवोपासक आहे. बसवेश्वरांनी त्याचा आग्रही पुरस्कार केलाआहे. आजही बहुदेवो उपासना प्रचलित आहे. अंधश्रद्धेला लोक बळी पडताना दिसतात. दगडाला शेंदूर फासून देव करतात व त्याचे विर्सजन ही करतात. बसवेश्वरांनी देहालाच देवालय मानले आहे. ते आपल्या एका वचनात म्हणतात,

देह माझे देवालय, देवळाचा खांब माझे पाय ।
मस्तक माझे सुवर्ण कळस, स्थावर पावे नाश ।

देहाला त्यांनी दिलेले महत्त्व आपल्या लक्षात येते. देह म्हणजेच माणूस. माणूस हाच त्यांच्या वचनाचा केंद्रबिंदू आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. 'कायकवे कैलास' हे महात्मा बसवेश्वरांचे घोषवाक्य आहे. कर्म हाच धर्म, कृती हीच मुक्ती, कर्तव्यपूर्ती हीच ईश्वरप्राप्ती हाच या संकल्पेनचा आशय होय. बसवेश्वरानी कायक म्हणजे श्रम याला महत्त्व दिले आहे. श्रम हेच सर्वश्रेष्ठ असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला आहे. १२व्या शतकात उद्योगापेक्षा संन्याशाला अधिक महत्त्व होते. त्या काळात बसवण्णा यांनी श्रमाचे महत्त्व रूजविले. जीवनातील विविध क्षेत्रात व्यापलेली अंधश्रद्धा, रूढी परंपरा, जातीयता मोडीत काढली आणि सर्वात समभाव भरुन क्रांती केली.

स्वतःच्या नितीशील कर्तव्यपूर्तीपेक्षा जगात कोणतीच गोष्ट दिव्य, भव्य, उन्नत, उत्तम, श्रेष्ठ व आनंददायी नसते. श्रम हीच पूजा आहे, श्रम हाच देव आहे, श्रम हाच स्वर्ग आहे, श्रम हाच कैलास आहे. श्रम हेच सर्वस्व आहे हा 'कायकवे कैलास' या संकल्पनेचा आशय होय. वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय विकासाचे एक सूत्र, एक मंत्र, एक तत्त्व, एक सिद्धांत या दृष्टिकोनातून महात्मा बसवेश्वरांनी 'कायकवे कैलास' याचा उद्घोष केला. श्रम करतो तोच आरोग्यपूर्ण उत्तम जीवन जगतो असे चित्र अलिकडे पहावयात मिळते. या श्रमाचे महत्त्व आणि महात्म 'कायकवे कैलास' या वचनवाक्यात महात्मा बसवेश्वरांनी ९०० वर्षांपूर्वी प्रतिपादन केले आहे. यासंदर्भात ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त लेखक डॉ. व्ही. के. गोकाक म्हणतात, 'बसवेश्वर हे आधुनिक विचारवंतापेक्षा अधिक आधुनिक होते.'

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

- **प्रजाप्रभुत्व -**

महात्मा बसवेश्वराच्या वचन साहित्यातील नजरेत भरणारी महत्त्वाची बाब म्हणजे त्यांची प्रजाप्रभूत्वाची संकल्पना. या संकल्पनेत स्वार्थ नाही. अंहभाव नाही, प्रजासत्ताक नाही आणि भष्ट्राचार तर मूळीच नाही. प्रजासत्तकापेक्षाही श्रेष्ठ प्रजाप्रभूत्व आहे. सकळ जीवात्म्याची कल्याण इच्छिणारी संकल्पना या त्यांच्या प्रजाप्रभूत्त्वात दडलेली आहे. कारण प्रजासत्ताक मध्ये सत्ता आहे म्हणजे जेथे सत्ता तेथे स्वार्थ, अहंभाव, भ्रष्टाचार, खोटेपणा, हिंसा इत्यादी सर्वकाही असल्याचे आपण पहातो. हे लक्षात घेतल्यानंतर आपणास प्रजाप्रभुत्व या संकल्पनेचा व्यापक अर्थ लक्षात येतो.

बसवेश्वरांचा समाज आपणास अहंभावनेतून दासोहं म्हणजेच निःस्वार्थ विनियोग भावनेकडे नेतो. अस्पृशता भावनेतून समूह प्रज्ञाकडे, अंधविश्वासातून वैचारिकतेकडे, बहुदेवोपासनेपासून एकदेवोपासनेकडे, मंदिरापासून संसदरूपी अनुभव मंटपाकडे, व्यक्ती प्रभुत्वापासून प्रजाप्रभुत्वाकडे, कर्मसिद्धांतापासून कायक सिद्धांताकडे, स्वार्थमार्गापासून निःस्वार्थ भक्तीमार्गाकडे, असमानतेतून समानतेकडे घेऊन जाणारा आहे.

महात्मा बसवेश्वर हे बसवकल्याण (जिल्हा बीदर-कर्नाटक) येथे बाराव्या शतकात आपल्या महामंत्रीपदाचा कार्यभार सांभाळून लोकहितार्थ सामाजिक आर्थिक, धार्मिक, वैचारिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात प्रयत्नशील राहिले. विशेषतः शुद्र-अतिशुद्ध व स्त्रियांना समाजात समान हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी 'मौनक्रांती' केली.

मध्ययुगात प्रामुख्याने कौर्यच नांदत होते. अशा काळात दक्षिण भारतात बसवेश्वरांनी प्रजा प्रभुत्वाचे स्वप्न पाहिले. ते राज्य शक्तीला प्रजाप्रभूत्व शक्तीमध्ये परिवर्तीत करू पहात होते. म्हणून त्या काळात असलेल्या संप्रदायबद्ध समाजात त्यांनी प्रजाप्रभुत्ववादी पर्यायी समाजाची रचना केली. आपआपले देव आणि धर्म आपआपसात असले पाहिजेत परंतु आम्ही समाजात एक भावाने व्यवहार केला पाहिजे. हाच प्रजाप्रभुत्वाचा उद्देश आहे. प्रजाप्रभुत्ववादी विचारावर मूळ चिंतन व मंथन करण्यासाठी 'अनुभव मंटप' ही संकल्पना रुजविली. महात्मा बसवेश्वरांनी इष्टलिंगाद्वारे देवाचे खाजगीकरण केले. देवळात न जाता वैयक्तिक पूजा करण्यास प्रवृत्त केले. जंगमलिंगद्वारे मनुष्याचे सामाजिकरण केले. आज बसवेश्वरांच्या प्रजाप्रभुत्वाच्या विचारास संविधानाद्वारे राजाश्रय मिळाला आहे. आंतरजातीय विवाह, विधवा विवाह, देवदासी विवाह, स्त्रीमुक्ती चळवळ, अस्पृशता निवारण चळवळ, स्त्री-पुरुष समानता इ. सर्व चळवळी महात्मा बसवेश्वरांनी १२व्या शतकात केल्या होत्या. हे आज लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

- **वचनातील आधुनिक विचार -**

महात्मा बसवेश्वरांनी जीवनातील विविध क्षेत्रात व्यापलेली अंधश्रद्धा, निर्रथक रूढी परंपरा, सर्वात समभाव भरून सर्वतामुखी क्रांती, जातीयता निवारण, करण्याचा प्रयत्न केला. दलितांचे उद्धार २०व्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला असला तरी त्याचे बीज बसवेश्वरांनी १२व्या शतकातच पेरले होते. मांग, ढोर अशा सर्व जातीतील लोकांना त्यांनी स्वकियांचा दर्जा दिला आहे. म्हणून ते म्हणतात ङ

'पिता माझा मांग चेनय्या, पितामह माझा ढोर ककय्या
चुलता माझा कण्णय्या, बंधू माझा किन्नरी बोम्मय्या'

ही केवळ त्यांची घोषणा नव्हती तर अनुभव मंटपात असा सर्वसमावेशक नवा समाज निर्माण करुन दाखविला. तिथे फक्त शरणांची एकच जात मानली जात असे. दासी, वेशापुत्र ही त्यांना साक्षात शिव भासतात. एका वचनात ते म्हणतात,

'दासी पुत्र असो, वेश्यापुत्र असो शिव दीक्षा झाल्यास
साक्षात शिव म्हणूनी, वंदनी, पादोदक प्रसाद घेणे योग्य'

अशा वचनाद्वारे ते समाजाला उंच, उन्नत अवस्थेला घेऊन जातात.

- **वचनातील पुरोगामित्व -**

महात्मा बसवेश्वरांची विचारसरणी अत्यंत क्रांतीकारक होती. त्यांनी उच्चनिचतेच्या व विषमतेच्या पायावर उभारलेल्या चातुवर्णाचे खंडण केले. धर्मआचारणातील वेडगळ व अनिष्ठ धर्मरुढींना तिलांजली दिली. समता, विश्वबंधुत्व, अंहिसा, सत्य, प्रेम या सारख्या उदात्त तत्त्वावर वीरशैव धर्माची पूनर्घटना केली. धर्मज्ञान ही केवळ ब्राह्मणांची मक्तेदारी घेऊ शकत नाही असे स्पष्ट मत बसवेश्वरांनी मांडले. धर्मक्षेत्रातील सुधारणाबरोबर बालविवाहास विरोध, मिश्र विवाह, पुर्नविवाह याचा पुरस्कार केला. ब्राह्मण शिवशरण मधुवय्या यांच्या मुलीचा विवाह शिवशरण हरळय्या या मागासवर्गीय मुलाशी लावून दिला. म्हणजे ते बोलके सुधारक नव्हते. तर कर्ते सुधारक होते. महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियांना मोक्षप्राप्तीचा मार्ग मोकळा करून दिला. आध्यात्म साधनेमध्ये पतीपत्नी दोघांनी भाग घ्यावा त्या दोघांनी केलेली भक्ती शिवाला



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

अधिक प्रिय आहे. असा उपदेश त्यांनी केला हे स्वातंत्र्य स्त्रियांना मिळावे म्हणूनच अक्कमहादेवी, अक्कनागम्मा, निलाबिंका, नीलम्मा, गंगाबिंका, सुगलव्वा या स्त्रिया शिवशरणी झाल्या. अशाप्रकारे महात्मा बसवेश्वरांनी आध्यामिक व धार्मिक लोकशाहीची स्थापना केली. महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपात येणाऱ्यांना १) प्रत्येकाने घाम गाळून आपली भाकरी मिळविली पाहिजे. २) प्रत्येकाने आवडीनुसार व स्वभावानुसार काम निवडावे. ३) प्रत्येकाने आपल्यास जेवढे लागेल तेवढेच द्रव्य कमवावे. ४) आपल्या उदरनिर्वाहासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहून इतरांना त्रास देऊ नये अशी सक्त ताकीद त्यांनी आपल्या अनुयायांना दिली होती. 'कायकवे कैलास' (कर्म हाच देव) हा बसवेश्वरांचा मूलमंत्र होता. बसवेश्वरांनी अशारीतीने श्रमाची प्रतिष्ठा वाढविली. श्रमाला महत्त्वाचे स्थान निर्माण केले.

महात्मा बसवेश्वराच्या वचन वाङ्मयाचा विचार करता त्यामध्ये एकेश्वरवाद, श्रमप्रतिष्ठा, दासोह, सदाचार, भक्तीमार्ग, आत्मनिरिक्षणात्मक वचन साहित्य, विद्रोही वाङ्मय, प्रश्नार्थक स्वरुपाचे वचन वाङ्मय, वचनातील प्रतिमा व प्रतिके, वचनातील नवरस इ. वैशिष्ट्ये आपणास दिसून येतात. त्याच्या वचन साहित्यात धार्मिक, सामाजिक, नैतिक असे प्रबोधन तळमळीने केले आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या अंतःकरणाला वचने भिडली आहेत. संपूर्ण सामाजिक जीवनाचा आशयच वचनसाहित्यात अंतर्भूत झालेला आहे. म्हणूनच हे वचनसाहित्य वीरशैव साहित्याचा मुकूटमणी होय. महात्मा बसवेश्वराचे 'अंतरंग शुद्धी', 'बहिरंग शुद्धी' आणि 'कायकवे कैलास' ही तीनच तत्वे जर मानव समाजात रूढ झाली तर लोककल्याण आणि लोकोद्धार व्हायला वेळ लागणार नाही. सुविचार, सदाचार आणि संस्कारांचा त्रिवेणी संगम या वचन साहित्यात आढळतो. यातील भाषा प्रश्नार्थक, संवादात्मक आणि गद्य पद्यात्मक आढळते. त्यातील वाक्ये साधी, सोपी, अर्थपूर्ण, हृदयाला भिडणारी, चिंतन करायला लावणारी वाटतात. महात्मा बसवेश्वर हा केवळ पूजनाचा किंवा मिरवणूकीचा विषय नाही तर आचरणाचा आहे. आज २१व्या शतकातही या वचनांची अंत्यत गरज आहे. हे लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

संदर्भ ग्रंथ

1) बसवेश्वरी वचन साहित्य – संपादक – प्रा. विजय करजकर,
प्रा. राजशेखर सोलापूरे
2) वीरशैव व इतर धर्म आणि समाज – डॉ. सुर्यकांत घुगरे
3) बसव वचनामृत – लिगाडे जयदेवी
4) श्री बसवेश्वर – डॉ. रविंद्र किंबहुणे
5) मराठी विश्वकोश – खंर – 11 – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.